Review Of Research
Vol.1, Issue. 8 , May . 2012
ISSN:-2249-894X Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# धनाजी जाधव व महाराणी ताराबाई संबंध : ऐतिहासिक मुल्यांकन

डॉ. डी. एस. कडव

**सारांश –**

मराठ्यांचे सेनापती धनाजी जाधव व महाराणी ताराबाई या दोघांच्याही दृष्टीने राजाराम महाराजांचा राज्यप्रमुखत्वाचा कालखंड महत्वपूर्ण व त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला धनाजी जाधव महाराणी ताराबाई यांना स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्याची व मराठा सत्ता कारणात स्वतःचा प्रभाव व स्थान निर्माण करण्याची संधी प्राप्त झाली. धनाजी जाधवांना सरसेनापती पदापर्यंत मजल मारता आली. तर ताराबाईनां राज्य चालविण्या करीता लागणारा प्रशासकीय व लष्करी कार्याचा अनुभव याच काळात पाप्त करता आला. याच अनुभवाच्या जोरावर राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईला मराठा स्वातंत्र्य युद्धाचे यशस्वी नेतृत्व करणे, तर धनाजींना दीर्घकाळ सेनापती म्हणून कार्य करणे शक्य झाले या दोघांच्याही कामगिरी मुळे स्वातंत्र्य युद्धाचा शेवट मराठांच्या यशाने व मोगलांच्या पराभवाने झाला. असे असलेतरी या दोघांमध्ये बेबनाव असल्याचेही दिसून येते काही प्रकरणी महाराणीने धनाजी जाधवांच्या विरोधकांच्या बाजूने न्यायनिवाडे केलेत. धनाजींचे सेनापती पद कायम ठेवले असलेतरी, दोघांमधील बेबनाव संपुष्ठात आला नव्हता. धनाजींच्या मनात महाराणी विषयी विरोध व अपमानाची भावना अस्तित्वात होती. पण ती त्यांनी प्रकट होऊ दिली नाही. योग्य संधीची ते प्रतीक्षा करू लागले. ती संधी शाहू महाराजांच्या आगमनानंतर खेडच्या युद्धामुळे प्राप्त झाली धनाजींनी ताराबाईच्या पक्षाचा त्याग करून शाहू महाराजांचे अधिपत्य स्वीकारले यामुळे ताराबाईची सत्ता नाममात्र उरली. मराठ्यांचा छत्रपती म्हणून शाहूला मान्यता मिळाली. अशा प्रकारे धनाजी जाधवांच्या ताराबाई विरोधी भूमिकेमुळे मराठ्यांच्या इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली. या पार्श्वभूमीवर धनाजी जाधव यांचे महाराणी ताराबाईशी असलेल्या संबंधावर उपलब्ध साधनांच्या व पुरव्याच्या आधारे प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने सदर शोध निबंध सादर आहे.

**वृत्तांत –**

धनाजी जाधव व महाराणी ताराबाई यांचा परस्पर सबंध छत्रपती संभाजी महाराजांच्या काळापासूनच आला. ताराबाई या मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या व राजाराम महाराजांच्या पत्नी होत्या. हंबीरराव मोहितेंच्या नेतृत्वाखाली धनाजी जाधव कार्यरतच नव्हते, तर संभाजी महाराजांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती पद प्राप्त करून देण्यात हंबीरराव मोहितेनां धनाजींनी साथ दिली होती[१]

संभाजी राजाच्या वधानंतर मोगलांच्या सर्वकष आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर पुढील धोरण ठरविण्याकरिता व राजाराम महाराजांकडे मराठा राज्याचे नेतृत्व सोपविण्याकरीता रायगडावर जी मसलत केल्या गेली त्यात धनाजीही सामील होते. डॉ. जयसिंगराव पवार यांनी नमूद केल्याप्रमाणे " राजाराम महाराजांनी कर्नाटकात जातांना महाराष्ट्राचा कारभार पाहण्यासाठी ताराबाईच्या नेतृत्वाखाली प्रमुख सरदारांचे एक 'राजमंडळ' स्थापन केले होते. त्यात धनाजी जाधावांचाही समावेश होता."[२] मात्र भारतीय इतिहास आणि संस्कृती या त्रैमासिकात उल्लेख असल्याप्रमाणे " महाराष्ट्रातील सर्व कारभाराचा प्रमुख म्हणून रामचंद्र पंत अमात्यांना नियुक्त करण्यात आले होते."[३]

आशा प्रकारे राजाराम महाराजांच्या काळातच महाराणी ताराबाई यांना प्रमुख राजकारभारी नेमण्याविषयी मतमतांतरे असली तरी महाराणी या नात्याने ताराबाईने राज्यकारभाराकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला होता. या शिवाय खाफीखानाने "ताराबाई ही राजारामाची थोरली बायको....सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या ह्यातीतच तिचा मोठा लौकिक होता." असे नमूद केले नसते.[४]

वरील बाबींचा विचार करता राजाराम महाराज जिंजीला गेल्यानंतर राज्यकारभार व मोगलांविरूढ आखण्यात आलेल्या मोहिमा या बाबतीत ताराबाईचा सल्ला महत्वपूर्ण ठरणारा होता. स्वाभाविकरित्या मोगलांविरूधाच्या मोहिमा धनाजी जाधवांच्या नेतृत्वखाली काढण्यात आल्या होत्या. कर्नाटकात राजाराम महाराजांच्या मदतीला जाण्यापूर्वीपर्यंत धनाजींनी महाराष्ट्रात मोगलांविरुद्ध लढा दिला. महाराणी ताराबाई या सुद्धा १६९१ पर्यंत महाराष्ट्रातच होत्या.[५] त्यामुळे धनाजी व ताराबाई यांच्यात सल्लामसलत होत असणार.

१६९० नंतर महाराणी ताराबाई जिंजीला गेल्या होत्या. त्या त्या ठिकाणी महाराजासोबतच होत्या व त्यांच्या सोबतच जिंजीवरून महाराष्ट्रात परतही आल्या. याचा अर्थ १६९०-९१ नंतर महाराष्ट्रात परत येई पर्यंत राजाराम महाराजांनी जो कारभार केला किंवा निर्णय घेतले, त्यात महाराणी या नात्याने ताराबाईचा सहभाग असणे क्रमप्राप्त ठरते.६ जर ताराबाईचा सहभाग नसता किंवा त्या राज्यकारभारात सामील नसत्या तर खाफीखान यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना लष्करी व प्रशासकीय कामकाजाचा अनुभव प्राप्त झाला नसता.

या काळातही धनाजी जाधव कर्नाटकात कार्यरत राहिले. ते राजाराम महाराजांच्या थेट नियंत्रणात होते. राजाराम महाराजांनी ज्यावेळी सेनापती पदावर नेणूक करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी ते पद धनाजी जाधवांना देण्याचे त्यांच्या मनात आले होते. पण ते संताजी घोरपडे यांना देण्यात आले. यावेळी रामचंद्र पंत अमात्य यांच्या सल्ल्यानुसार महाराजांनी संताजीला सरसेनापती पदावर नेमले असल्याचे तत्कालीन कागदपत्रामध्ये व मान्यवर इतिहासकारांनी नमूद केलेल्या पत्रावरून दिसून येत असले[७] ,तरी महाराणी ताराबाई यांची यावेळची सक्रियता, महत्वाकांशी वृत्ती लक्षात घेता सरसेनापती पदावर नेमणूक करतांना ताराबाईने निश्चितपणे आपले मत दिले असणार. केवळ रामचंद्र पंत अमात्यांनीच शब्द टाकला म्हणून संताजी घोरपडे यांना राजाराम महाराजांनी सेनापती पदावर नेमले असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांऐवजी संभाजी राजांना गादी मिळवून देण्यात धनाजी साह्यभूत ठरल्याची जाणीव ताराबाईला होती. त्याचे विस्मरण होणे शक्य वाटत नाही. मात्र धनाजीचा संयमित स्वभाव, राज्यप्रमुखाचा निर्णय विरोधात असला तरी, त्या निर्णयाचा प्रतिरोध न करण्याची वृत्ती यामुळे धनाजींनी उघड प्रतिक्रिया व्यक्त केली नसावी. मात्र यावेळी सेनापतीपद न मिळाल्याचे शल्य त्यांच्या मनात बोचत असणारच. हे शल्य शाहू महाराज महाराष्ट्रात परत आल्यानंतर खेडच्या मैदानावर झालेल्या संघर्षाच्या वेळी प्रकट झाल्याचे उघड आहे.

वरील घटनाक्रमावरून उघड दिसत नसले तरी धनाजी जाधव व ताराबाई यांचे परस्पर संबंध पूर्णपणे सलोखा व सदभावनेचे नव्हते. हे गिरजोजी यादव प्रकरणावरून दिसून येते. डॉ. जयसिंगराव पवार यांनी " राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात परत आल्यानंतर सातारा येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली या ठिकाणी ताराबाईचे वास्तव्य होते. याच वास्तव्यात राज्याचा सेनापती धनाजी जाधव व राजघराण्याच्या अंत:पूरचा सरहवालदार गिरजोजी यादव यांच्या दरम्यान उध्दभवलेल्या तंट्याचा निवडा महाराणी ताराबाईनी केल्याचे नमूद केले आहे."[८] या वादात ताराबाईने धनाजीच्या विरोधात गिरजोजीच्या बाजूने निर्णय दिला जरी डॉ. जयसिंगराव पवार व काही लेखकांनी धनाजी-गिरजोजी वादात ताराबाईने नि:पक्ष निवडा केल्याचे नमूद केले असले तरी Brij kishor यांनी त्यांच्या Tara Bai And Her Times या पुस्तकात " Girjoji Yadav was confidential adviser and all orders of Tara Bai were issued through him. असे नमूद केले आहे[९] यावरून ताराबाई व गिरजोजी यांचे संबंध अति सलोख्याचे व विश्वासाचे होते, ताराबाईची मर्जी गिराजोजीवर होती त्यामुळे याचा प्रभाव धनाजी विरुद्धच्या निर्णयावर झाला असल्याची शक्यता नाकारणे धाडसाचे ठरेल. सदर निर्णय विरोधात असला तरी धनाजीने त्याचा कोणत्याही प्रकारे प्रतिरोध केला नाही. तो निमुटपणे मान्य केला. मात्र मानवी स्वभावाचा विचार करता, या प्रकरणी झालेला अपमान धनाजी जाधव विसरणे शक्य नव्हते. शाहू आगमनानंतर ताराबाईच्या पक्षाचा त्याग करण्याचा निर्णय करण्याकरिता हा अपमानही साह्यभूत ठरला असणारच.

इ. स. १७०० मध्ये राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर दासीपुत्र कर्ण याला छत्रपती पदावर आरूढ करण्यात आले. या बाबतीत धनाजी जाधवांनी महत्वाची भूमिका पार पडली असे मत सरदेसाई व सरकार यांनी व्यक्त केले आहे. मात्र त्यावेळी आपला पुत्र शिवाजी तिसरा याला छत्रपती पदी विराजमान करण्याची इच्छा ताराबाईची होती, असे मत रियासतकार सरदेसाई यांनी व्यक्त केले आहे.[१०] यामुळे धनाजी व ताराबाई यांच्या संबंधात विरोध व दुरावा निर्माण झाला होता.

मात्र डॉ. जयसिंगराव पवार यांनी छत्रपती राजारामाच्या मृत्यूनंतर राजा कर्ण याला गादीवर बसविण्याची घटना खोटी असल्याचे व १० मार्च १७०० रोजी विशालगाडावर ताराबाई पुत्र शिवाजी तिसरा यांचे विधियुक्त मंचकारोहण होवून ते गादीवर बसल्याचे यादव दप्तरातील पत्राचा आधार घेऊन लिहिले आहे.[११] काही का असेना राजारामाच्या मृत्यूनंतर धनाजी जाधव व महाराणी ताराबाई यांच्यात प्रारंभी विसंवाद असल्याचे सिद्ध होते. ब्रिज किशोर हे Tara Bai And Her Times या पुस्तकात लिहितात. "........her relations with her generals and other civil officers were not always very cordial. Dhanaji also continued to serve her but he was also in the same resentful mood in which Ramchandra was. Out of sheer patriotism these two leaders submitted to the dictatorship of imperious Tara Bai."[१२]

वरील लिखाणावरून धनाजी जाधव व ताराबाई यांच्यात मतभेद असले तरी, दोघांनीही त्या मतभेदाचा परिणाम राज्याच्या कारभारावर विशेषतः मोगलाविरुद्धच्या मराठ्यांच्या प्रतिकारावर होऊ दिला नाही. सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे राजा कर्ण यांच्या मृत्यूनंतर ताराबाई पुत्र तिसरा शिवाजी यांना राज्यप्रमुख म्हणून गादीवर बसविण्याचा जो निर्णय घेण्यात आला, त्याला धनाजींनी समर्थन दिल्यामुळे महाराणी ताराबाईच्या मनातील त्यांच्या विषयीची कलुषित भावना संपुष्टात आली. म्हणून नव्या राजवटीतही ताराबाईनी सेनापती पदावर धनाजी जाधवांना कायम ठेवले.[१३]

धनाजींनीही राज्यहिताचा व वस्तुस्थितीचा विचार करून ताराबाईचा प्रतिरोध न करता संपूर्ण लक्ष व शक्ती मोगलाविरुधच्या युद्धात खर्ची घातली. पूर्ण निष्ठा व प्रामाणिकपणाने मोहिमा काढून मोगलांचा प्रतिकार केला. यावेळी त्यांनी ताराबाईशी समन्वय साधल्याचे दिसून येते. ताराबाईनेही धनाजीशी सल्लामसलत करूनच मोहिमांची आखणी केल्याचेही स्पष्ट होते. उपलब्ध पुराव्यावरून ताराबाईच्या नेतृत्वाखाली धनाजींनी केवळ सेनापती या नात्याने लष्करी कार्यच केले नाही तर राज्याच्या इतर गरजांकडेही लक्ष दिल्याचे दिसून येते सेतु माधवराव पगडी यांनी मोगल - मराठा संघर्ष या पुस्तकात नमूद केले आहे की, "महाराणी ताराबाई अनेकदा पैशाची व्यवस्था करण्यासाठी धनाजींना सांगत होत्या."[१४]

अशाप्रकारे धनाजी व ताराबाई हे आवश्यकते नुसार परस्पराशी विचार विनिमय करत असले तरी व महत्त्वाच्या प्रसंगी ताराबाई धनाजीशी सल्ला मसलत करून निर्णय घेत असले तरी काही प्रसंगी परस्पर विरोधी भूमिका घेतल्याचेही उल्लेख सापडतात. ताराबाईच्या कारकिर्दीत पुन्हा गिरजोजी यादव व धनाजी जाधव यांच्यात वाद निर्माण झाला. ताराबाईने १० गावे धनाजीकडून परत घेऊन गिरजोजीस देण्याचा निर्णय केला[१५] मराठ्यान विरुद्धचा संघर्ष थांबवून समझोता करण्याच्या उद्देशाने औरंगजेबाने ताराबाईकडे वाटाघाटीचा प्रस्ताव पाठविला. या वाटाघाटी धनाजी जाधवांच्या माध्यमातून सुरु केल्या गेल्या. धनाजी जाधवांनी शाहू महाराजांना कैदेतून मुक्त करून महाराष्ट्रात सुरक्षीतरित्या परत आणण्याच्या दृष्टीकोनातून वाटाघाटी सुरु केल्या. आळंधी येथे शहजादा कामबक्षाचे प्रतिनिधी व धनाजी यांची भेट झाली. त्यानुसार धनाजीने आणला प्रतिनिधी म्हणून बाळाजी विश्वनाथाला कामबक्षाकडे पाठविले. बाळाजी विश्वनाथाने औरंगजेबाचीही भेट घेतली.[१६] तसेच हनुमंतराव निंबाळकर यांना ताराबाईकडे पाठवून मोगलांशी करावयाच्या वाटाघाटीच्या अटी कळविल्या[१७]

पण ताराबाईने मोगलांशी युद्धबंदी करण्याबाबतचा प्रस्ताव फेटाळून लावला. याकरिता मोगलांविरुद्ध मराठ्यांना उत्तरोत्तर लाभत असलेल्या यशामुळे मोगलांविरुद्ध निर्विवाद यश प्राप्त करू शकतो, असा ताराबाईला वाटणारा विश्वास कारणीभूत असला तरी, याहीपेक्षा युद्ध बंदी प्रस्तावात शाहूची सुटका करून ते महाराष्ट्रात परत येतील व राज्यावर आपला हक्क गाजवतील, त्यामुळे आपल्याला सत्ता गमवावी लागेल, अशी भीती ताराबाईला वाटत होती. ही भीती मोगलांचा प्रस्ताव नाकारण्यास मुख्यत्वे करून कारणीभूत ठरली धनाजींनी ताराबाईच्या या

नकार देण्याला प्रतिरोध केला नाही किंवा आग्रही भूमिका घेतली नाही. मात्र ताराबाई बद्दल त्यांच्या मनात निश्चितपणे विरोधाची भावना निर्माण झाली असणारच.

धनाजींने ताराबाईच्या निर्णयाचा आदर करून मोगलांविरुद्धचा लढा सुरूच ठेवला. मात्र औरंगजेबाचा कार्नाटकातील सुभेदार दाऊदखान पन्नी याचे संबंधाने धनाजी जाधवांनी नरमाईचे धोरण अंगिकारले होते ते धोरण मात्र ताराबाईला पटले नव्हते. सेतु माधवराव पगडी यांनी नमूद केले आहे "यावेळी अफवा पसरली होती की, महाराणी ताराबाईने धनाजीला ठार मारले."[१८]

६

सदर अफवा खोटी असली तरी महाराणी ताराबाई व धनाजी जाधव यांचे परस्पर संबंध सलोख्याचे नव्हते हे सिध्द होते. असे असतांना सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे " शाहू ला आपला ताबेदार बनवून मराठा मंडळात फुट पाडण्याच्या उद्देशाने औरंजेब बादशाहने शाहू ला मुक्त केले कामबक्षाच्या आज्ञेत वागुण दक्षिणेचे राज्य करीत जा असा हु कुम बादशाहाने केला यासाठी काही प्रांत शाहू महाराजांना तोडून दिले तसेच प्रांतातून चौथाई वसूल करण्याचा अधिकारही दिला.[१९]

मात्र औरंगजेबाने शाहू महाराजांना मुक्त केले असले तरी त्यावेळी ते महाराष्ट्रात परत आले नाही. ते मोगलांकडेच थांबले. दरम्यानच्या काळात २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला त्यांनंतर सम्राट पद प्राप्त केलेल्या आज्जमशहाने झिन्नतउन्नीसा बेगम हिच्या आग्रहा खातर शाहू महाराजांना महाराष्ट्रात परत पाठविले.[२०] अहमदनगरला येण्यापुर्वीच शाहू महाराजांनी महाराणी ताराबाईला कळविले की " आम्ही निघून स्वदेशी परत आलो. आता राज्य आम्ही करू. आपण मातुश्री आहात आपले व्यवस्थित चालविण्यास आम्ही कमी करणार नाही. आम्हाला आपला आशीर्वाद व अनुभव उपयोगी ठरेल."[२१]

पण ताराबाईनी कोणत्याही परिस्थितीत शाहू महाराजांकडे राज्याची सूत्रे न सोपविण्याचा निश्चय केला. सरदेसाई यांनी म्हटल्या प्रमाणे "ताराबाईने सर्व प्रमुखांकडून दुधभातावर हात ठेवून राजनिष्ठेची शपथ घेववीली कित्येकांनी साफ दिलाने आणभाक केली, तर कित्येकांनी काही कपट पोटात ठेविले. विशेषत: धनाजी व खंडो बल्लाळ यांचे अंत:करण नि:सशंय शाहू कडे होते संभाजीच्या वधापासुनच त्याच्या या पुत्रास वाचविण्यासाठी इतके वर्ष त्यांचा खटाटोप चालला होता.[२२]

अशा प्रकारे ताराबाईने वाट्टेल त्यामार्गाने शाहू ला सत्तेपासून दूर ठेवण्याचा, मुख्यत्वे करून शाहू महाराजांना मराठा सत्ता प्राप्त करता येणार नाही अशी व्यूव्ह रचना करण्याबरोबरच धनाजी जाधवांच्या नेतृत्वाखाली शाहू महाराजांच्या विरोधात लष्कर रवाना केले. शाहू महाराजांचे ताराबाईच्या हालचालीकडे लक्ष होतेच. त्यांनी ताराबाईचे लष्कर चाल करून येत असल्याची वार्ता कळताच, त्या लष्कराच्या प्रतिकारा करिता लष्करासह भिमा नदी ओलांडून खेडच्या मैदानावर तळ ठोकला. अशाप्रकारे महाराणी ताराबाई व शाहू महाराजांचे सैन्य परस्परा विरुद्ध संघर्ष करण्याच्या निश्चयाने खेडच्या मैदानावर समोरासमोर उभे ठाकले. महाराणी ताराबाईने शाहू विरुद्धच्या या युद्धाचे नेतृत्व धनाजी जाधव यांच्याकडेच सोपविले. डॉ. जयसिंगराव पवार यांनी म्हटल्याप्रमाणे " धनाजी जाधवांच्या निष्ठेवर व पराक्रमावर ताराबाईचा पूर्ण विश्वास होता."[२३]

मात्र प्रत्यक्ष युद्धाला प्रारंभ होण्याच्या आदल्या रात्री धनाजी जाधवांच्या राहु टीत खंडो बल्लाळ बाळाजी विश्वनाथ इत्यादींची गुप्त बैठक झाली. यात धनाजीने शाहू राजा हाच मराठा राज्याचा खरा वारसदार असल्याचे मान्य केले. तसेच होणाऱ्या लढाईत मनापासून लढणार नसल्याचेही व योग्य वेळ येताच शाहू महाराजांच्या दर्शनास येण्याचे वचन दिले. खंडो बल्लाळ यांनी धनाजीशी झालेल्या या मसलतीची बातमी शाहू महाराजांना कळविली ही मसलत अत्यंत गुप्त ठेवण्यात आली. धनाजीसोबत मोहिमेवर आलेल्या परशुराम पंडीत यांना तिचा सुगावाही लागला नाही.[२४]

दुसऱ्या दिवशी शाहू महाराज व महाराणी ताराबाईच्या सैन्यात खेडच्या मैदानावर (१२ ऑक्टोबर १७०७ रोजी) लढाई झाली. यात ताराबाईच्या सैन्याची दानादान उडाली. चिटणीस बखरीत नमूद आहे की, " महाराज लढाईस सिद्ध जाले. धनाजी जाधव व प्रतिनिधी चाल करून आले. परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर यांनी घोडे

चालवून लढाई केली. महाराजांनी चालून घेतले. प्रतिनिधी वगैरेची मोड होऊन पळून गेले. त्यांचे दहा-पाच हजार स्वार सापडले. सेनापतींनी आपले विचारातील सर्वास घेऊन घोड्यावरून उतरून मुजरे करून भेटले. महाराजांनी खेडच्या मैदानी मुक्काम केला. लोकांनी कामे केली त्यास बहुमान बक्षीस दिल्हे दुसऱ्या दिवशी सेनापतीच्या भेटी सन्माने करून जाल्या. सुमुहूर्तावर सेनापतीस पदाची वस्त्रे व बहुमान दिलाखंडो बल्लाळ यासही चिटणीसी वस्त्रे दिली."[२५]

अशाप्रकारे खेडच्या युद्धात धनाजींनी ताराबाईच्या पक्षाचा त्याग करून शाहू महाराजांचे अधिपत्य औपचारिकरित्या स्वीकारले. यामुळे ताराबाईच्या लष्कराचा पराभव अटळ होता. तो झालाही. मात्र धनाजींची भूमिका व पक्षत्यागाचा परिणाम महाराणी ताराबाईचा लष्करी पराभव होण्यापुरताच मर्यादित नव्हता. तर याचे तत्कालिक व दूरगामी परिणाम मराठा व राष्ट्रीय सत्ताकरणावर घडून आले. या युद्धानंतर शाहू महाराजांची सत्ता सर्वमान्य झाली. त्यांचे छत्रपतीपद सुरक्षित बनले शाहू महाराजांचा गट प्रबळ झाला उत्तर भारतात मराठा सत्तेचा नंतरच्या काळात जो प्रसार घडून आला, त्याची पायाभरणी या युद्धाने व त्यातील धनाजीच्या भूमिकेमुळे झाली असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण होणार नाही.

महाराणी ताराबाईचा विचार करता, महाराणीचा पक्ष व सत्ता कमकुवत झाली. नंतरच्या काळात कोल्हापूरच्या संभाजीशी जो संघर्ष निर्माण झाला त्याची बीजे यावेळी रोवल्या गेली. महराणी ताराबाईने धनाजीवर मोहापायी शाहू महाराजांचे स्वामित्व पत्करले असा आरोप केला असला तरी त्यानंतरही ताराबाईने धनाजींना शाहू महाराजांच्या पक्षातून फोडून आपल्या पक्षात आणण्याचे प्रयत्न केले. पण ते यशस्वी ठरले नाहीत. त्यांनतर २७ जून १७०८ पर्यंत अर्थात आपल्या मृत्यूपर्यंत धनाजी जाधव शाहू महाराजांचे सेनापती म्हणूनच कार्यरत राहिले एकंदरीत खेडच्या युद्धाबरोबरच धनाजी व ताराबाई संबंधाचाही अंत घडून आला.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे राजाराम महाराजांचे काळापासूनच धनाजी जाधव व महाराणी ताराबाई यांच्या संबंधात विसंवाद निर्माण झाला होता. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर खेडच्या युद्धापर्यंत त्यात वृद्धी होत गेली या विसंवादाचा अंतिम परिणाम धनाजी जाधवांनी ऐन खेडच्या युद्धाचे वेळी ताराबाईच्या पक्षाचा त्याग करून शाहू महाराजांचे औपचारिक अधिपत्य स्वीकारण्यात झाला.

या विसंवादाकरिता महराणी ताराबाईचा महत्वाकांक्षी स्वभाव व हुकुमत गाजविण्याची वृत्ती कारणीभूत ठरली. यामुळेच कळत न कळत धनाजींचा अपमान होऊन महाराणी विरोधी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. पण राज्यहिताचा व पोक्तपणाचा विचार करून धनाजींनी ताराबाई बद्दलची भावना प्रकट केली नाही किंवा प्रतीरोधही केला नाही. योग्य संधी व पार्यायाची ते वाट बघू लागले. शाहू महाराजांच्या महाराष्ट्रातील आगमनाने ती संधी व पर्याय त्यांना प्राप्त झाला.

शाहू महाराज हेच मराठा राज्याचे खरे वारसदर असल्याची त्यांची खात्री असली तरी त्यांचे अधिपत्याखाली राज्य व स्वत:च्या सन्मानाचे संवर्धन अधिक योग्यप्रकारे होणार अशी ठाम समजूत बनली. या समजूतीतुनच धनाजींनी महाराणी ताराबाईच्या पक्षाचा त्याग करून शाहू महाराजांचे अधिपत्य स्वीकारले. यामागे मोहापायी विश्वासघाताची वृत्ती नव्हती किंवा पदाची लालसा नव्हती ज्या सरदाराने प्रारंभा पासून पदे उपभोगली त्याला पदाचा मोह राहू शकत नाही ही बाब धनाजींना लागू होते. ताराबाई किंवा शाहू महाराज यापैकी स्वभाव वर्तणूक, कायदेशीर हक्क याचा विचार करता शाहू महाराजांचा पक्ष योग्य असल्याची खात्री धनाजींना होती त्यामुळे त्यांनी महाराजांचा पक्ष स्वीकारला. एकंदर व्यक्तीगत लाभ, हेवेदावे, पद यापेक्षा राज्यहिताचा विचार व कार्य अधिक महत्त्वाचे असल्याचा आदर्श धनाजी जाधवांनी घालून दिला तर सत्तेची लालसा अधिक ठेवण्याचे, हाताखालील अधिकाऱ्यांची अवमानना करण्याचे दीर्घकालीन परिणाम काय होतात, हे महाराणी ताराबाईच्या धनाजीशी असलेल्या संबंधावरू समजून येतात. हेच प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न सदर शोध निबंधाद्वारे केला आहे.

**तळटीपा :**

१. सरदेसाई गो. स. ' मराठी रियासत खंड १ ला' आवृत्ती तिसरी, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९३५ पृ. २२९.

व जोशी श. ना. (संपा) ' संभाजी कालीन पत्र सारसंग्रह' भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे पृ. १०६.

२. पवार जयसिंगराव ' मराठेशाहीचा मागोवा' मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९९३ पृ. २१५.
भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रेमासिक अंक ६४, १९९१ पृ.१४ पवार, अप्पासाहेब (संपा)

४ पवार, अप्पासाहेब (संपा) ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १, कोल्हापूर, १९६९ पृ. १०४-१०७.

५ पवार जयसिंगराव - मराठे शाहीचा मागोवा- पृ. २१५.

६ कित्ता - पृ. २१५.

७ साने का. ना. (संपा) – चिटणीसकृत राजाराम चरित्रम १९२३.

८ पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा पृ. २५३, २५४.

९ ब्रिजकोशोर – TARABAI AND HER TIMES. Asia Publication House Bombay ,१९६२ पृ. ६७

१० सरदेसाई – मराठा रियासत पाप्पुलर प्रकाशन, मुंबई १९८९.
खंड २. पृ. २९४, २९५.

११ पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा पृ. २१०.

१२ ब्रिज किशोर – TARABAI AND HER TIMES, Asian Publication House Bombay, १९६२ पृ. ६६

१३ सरदेसाई म. रि. खंड २ पृ. २६०.

१४ पगडी, सेतुमाधवराव (संपा) मोगल – मराठे संघर्ष – फुल्हाने आलमगिरी लुत्फुलाची पत्रे पुणे १९६४ पृ. १२९.

१५ पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा पृ. २५३, २५४.

१६ पगडी, सेतुमाधवराव (संपा) – 'मराठे व औरंगजेब' मासिरे आलमगिरी ज्ञानराज प्रकाशन, पुणे १९६३ पृ. १४३

१७ खरे ग. ह. , कुळकर्णी गो. त्र्य. (संपा) " औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार" पुणे १९७३ पृ. १५

१८ पगडी - मोगल – मराठे संघर्ष पृ. २०२.

१९ सरदेसाई म. रि. खंड २ पृ. ३०६

२० कित्ता – म. रि. खंड ३ पाप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९ पृ. २८.

२१ पवार जयसिंगराव – मराठी सत्तेचा उदय, कोल्हापूर १९७९, पृ.४६

२२ सरदेसाई – म. रि. खंड ३ पृ. ४४.

२३ पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा पृ.२५२

२४ कित्ता

२५ गर्गे स. मा. – करवीर रियासतीची कागदपत्रे खंड-१ पुणे, १९७०,पृ.८५,८६

❖ पवार जयसिंगराव – मराठेशाहीचा मागोवा पृ. २५३.